14 JUL 2011

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ कार्यक्षेत्रात चार विद्या शाखांची अंमलबजावणी

## शासन आदेशानुसार कार्यवाही | जुन्या ९ ऐवजी नवीन ४ विद्या शाखांची निर्मिती : अभ्यासक्रमात बदल नाही

प्रतिनिधी
कोल्हापूर

महाराष्ट्र विद्यापीठ नवीन कायद्यानुसार विद्यापीठ अंतर्गत विद्याशाखांच्या नियमामध्ये बदल केले आहेत. १९९४ च्या जुन्या कायद्यानुसार पूर्वी ९ विद्या शाखा होत्या. यामध्ये बदल करून ४ विद्या शाखा निर्माण केल्या आहेत. यामध्ये विज्ञान व तंत्रज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन, मानवविज्ञान, आंतर-विद्याशाखांचा समावेश आहे. या विद्याशाखांतर्गत अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी शासनाने विद्यापीठाला आदेश दिले आहेत. त्यानुसार चार विद्या शाखांच्या अंमलबजावणीस प्रारंभ झाला आहे.

१९९४ च्या विद्यापीठ कायद्यात कला, ललित कला, सामाजिकशास्त्र, विज्ञान, विधी, वाणिज्य, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान या ७ मुख्य विद्याशाखा होत्या. तसेच वैदिकशास्त्र व आयुर्वेद आणि युनानी या २ विद्या शाखाही होत्या. जुन्या ९ विद्या शाखांचे अभ्यासक्रम आता



नवीन ४ विद्या शाखांमध्ये शिकवले जाणार आहेत. पूर्वीच्या अभ्यास मंडळावर निवडून आलेल्या शिक्षकामधून विद्या शाखेचे अधिष्ठाता निवडले जात असत. हे अधिष्ठाता ज्ञानदानाबरोबरच विद्याशाखेचे अतिरिक्त काम करीत असत. नवीन कायद्यानुसार मात्र चार विद्या शाखांचे अधिष्ठाता कुलगुरू नियुक्त करणार असून ते पूर्णवेळ कार्यरत राहणार आहेत. विद्या शाखांच्या कामाला गती येणार आहे. विद्या शाखांची नावे बदलली तरी अभ्यासक्रमात बदल होणार नाही. कौशल्यावर अधारित अभ्यासक्रम तयार केले तर विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी मिळेल, अशी चर्चा विद्यापीठ वर्तुळात सुरू आहे.

### ... अशा आहेत विद्याशाखा

विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखांमध्ये विज्ञान शाखेतील जवळपास सर्व विषय आणि अभियांत्रिकी अभ्यासक्रमांचा समावेश करण्यात आला आहे.

- सोशल टेक्नॉलॉजी- विज्ञान, अभियांत्रिकी, टेक्नॉलॉजी, आर्किट्रेक्चर, फार्मसी
- कॉमर्स अॅन्ड मॅनेजमेंट-वाणिज्य, व्यवस्थापन
- ह्युमॅनिटीज- कला, मानसिक, नैतिक सामाजिकशास्त्र, विधी विभाग.
- इंटरडिसिप्लिनरी- मानसशास्त्र, शारीरिक शिक्षणशास्त्र, शिक्षणशास्त्र.

इंटरडिसिप्लिनरी स्टडीजमध्ये फाईन आर्ट, जर्नलिझम, सोशल वर्क, लॅब्ररी अॅन्ड इन्फर्मेशन सायन्स, बी होक, (नॉन सायन्स सबजेक्ट) होम सायन्स (नॉन सायन्स सबजेक्ट) हे विषय या विद्याशाखेत समाविष्ट करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

### विद्या शाखेतील सदस्य

- विद्या शाखेचे अधिष्ठाता पदसिध्द अध्यक्ष
- कलम १५ च्या पोटकलम (५) अन्वये नामनिर्देशित केले असल्यास सहयोगी अधिष्ठाता
- विद्या शाखेत अंतर्भूत असलेल्या विषयांसाठी प्रत्येक अभ्यास मंडळाचे अध्यक्ष
- प्रत्येक अभ्यास मंडळाने नामनिर्देशित केलेली एक व्यक्ती, जी मान्यताप्राप्त अध्यापक असेल आणि अभ्यास मंडळाचा सदस्य म्हणून नामनिर्देशित होण्यास पात्र असेल.
- प्र-कुलगुरूंनी विद्याशाखेच्या अधिष्ठात्याशी विचारविनिमय करून नामनिर्देशित करावयाच्या विद्या शाखेतील विषयांमध्ये उच्च विद्याविभूषित आणि औद्योगिक किंवा व्यावसायिक क्षेत्रातील पाच ख्यातनाम व्यक्तींना निमंत्रित करायचे आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 JUL 2017
पुढारी

# एम.एस्सी. रिक्त जागांसाठी उद्या प्रवेश फेरी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील एम.एस्सी. अभ्यासक्रमाच्या रिक्त राहिलेल्या जागांसाठी शनिवारी (दि.१५) पुनर्प्रवेश फेरी आयोजित करण्यात आली आहे. रसायनशास्त्र, प्राणीशास्त्र, पदार्थविज्ञान, इलेक्ट्रॉनिक्स, संख्याशास्त्र, गणित, ॲग्रो केमिकल व पेस्ट मॅनेजमेंट, भूगोल, मायक्रोबायोलॉजी या अभ्यासक्रमांसाठी ही प्रवेश फेरी होणार आहे. यापूर्वी प्रवेश परीक्षा दिलेल्या आणि प्रवेशासाठी इच्छुक असलेल्या विद्यार्थ्यांनी अधिविभागात सकाळी ११ वाजता उपस्थित राहावे, असे आवाहन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही.डी. नांदवडेकर यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 JUL 2017
महाराष्ट्र टाईम्स

# संगणकविषयक कार्यशाळा आजपासून

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा संगणकशास्त्र विभाग व क्विक हिल फाउंडेशनच्यावतीने १४ ते १५ जुलैअखेर फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅमचे आयोजित केला आहे. हा फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम संगणकशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. आर. आर. मुधोळकर यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे. संगणकशास्त्र विभाग, तंत्रज्ञान अधिविभाग इमारत, चौथा मजला शिवाजी विद्यापीठ येथे कार्यक्रम होणार आहे.

या फॅकल्टी प्रोग्रॅममध्ये प्राध्यापकांना आय. टी क्षेत्रासाठी आवश्यक C व C ++ या प्रोग्रॅमिंग भाषेचे सिस्टम लेव्हलचे प्रशिक्षण मिळाल्यामुळे त्यांचे ज्ञान अद्ययावत होईल व त्यांच्या ज्ञानाचा विद्यार्थ्यांना फायदा होईल. विद्यार्थी रोजगारक्षम बनण्यासाठी मदत होईल.

संगणकशास्त्र विभाग व क्विक हिल फाउंडेशन दरम्यान सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारानुसार विद्यापीठ संलग्नीत महाविद्यांलयातील प्राध्यापकांना आय. टी. क्षेत्रातील बदलत्या गरजानुसार आवश्यक अद्ययावत प्रशिक्षण देण्यात येणार आहे. सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण लक्षात घेता विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेविषयी जनजागृती व्हावी यासाठी क्विक हिल मोफत ऑनलाइन अभ्यासक्रम पुरवणार आहे. यासाठी संगणकशास्त्र विभाग मुख्य केंद्र असणार आहे.

14 JUL 2017 तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रेरा कायद्याविषयी रविवारी कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ विधी विभाग, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व क्रीडाई कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी विद्यापीठ येथे १६ रोजी सकाळी ९.३० ते दुपारी २ यावेळेत रेरा कायद्यावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेसाठी रेरा ॲथॉरिटीचे न्यायाधीश कापडणीस तसेच नेवगी लॉ फर्मचे ॲड. अभय नेवगी व ग्राहक कायद्यातील उदय बावीकर मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव न्यायमूर्ती उमेशचंद्र मोरे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 JUL 2017
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात रविवारी 'रेरा' कायदा विषयावर कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ विधी विभाग, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि क्रिडाई यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि.१६) 'रेरा' कायद्याबाबत कार्यशाळा होणार आहे. शिवाजी विद्यापीठातील मानव्यशास्त्र सभागृहात कार्यशाळा असणार आहे. सकाळी साडेनऊ ते दोन या वेळेत कार्यशाळेत तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेत 'रेरा' ॲथॉरिटीचे न्यायाधीश कापडणीस, ॲड. अभय नेवगी, ॲड. उदय बावीकर आदी मार्गदर्शन करणार असल्याची माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव न्यायाधीश उमेशचंद्र मोरे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 JUL २०१७
लोकमत

## 'रेरा'वर रविवारी कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ विधि विभाग, जिल्हा विधिसेवा प्राधिकरण व क्रिडाई कोल्हापूर यांच्यातर्फे शिवाजी विद्यापीठ येथील ह्युमॅनिटिज ऑडिटोरियम येथे रविवारी (दि. १६) 'रेरा' कायद्यावर कार्यशाळा आयोजित केली आहे. रेरा ॲथॉरिटीचे न्यायाधीश कापडणीस तसेच नेवगी लॉ फर्मचे ॲड. अभय नेवगी व ग्राहक कायद्यातील ॲड. उदय बावीकर हे मार्गदर्शन करणार आहेत.